उल्हासनगर महानगरपालिका
माहिती व जनसंपर्क विभाग

दूरध्वनी क्र. ०२५१-२७२०११६. विस्तार क्र.२२५ proumc321@gmail.com

दिनांक : ०१/१२/२०२३

# प्रेसनोट

प्रशासक तथा आयुक्त श्री. अजिज शेख व अति. आयुक्त श्री. जमिर लेंगरेकर यांच्या मार्गदर्शनाखाली उल्हासगर महानगरपालिकेच्या वतीने आज दि. 1/12/23 रोजी जार्गातिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला.

3 डिसेंबर हा जागतिक दिव्यांग दिन आहे. आज उल्हासनगर महानगरपालिकेच्या मिड टाउन हॉलमध्ये मोठया उत्साहात जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात आला. यावेळी उपस्थित दिव्यांग बांधवांना प्रवासाकरिता बॅग, जेवणाचा डब्बा आणि पाण्याची बाटली भेटवस्तु स्वरूपात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते देण्यात आली.

यावेळी दिव्यांगासाठी कार्य करणारे श्री. राजेद्र देठे, डॉ संजय गुप्ता यासह श्री. अशोक भोईर, सचिन सावंत, टिकम उदासी, श्री. राजेश साळवे यांचा महापालिकेच्या वतीने सन्मान चिन्ह देवून यथोचित सन्मान करण्यात आला.

यावेळी अति. आयुक्त श्री. जमिर लेंगरेकर, उप-आयुक्त डॉ सुभाष जाधव, मुख्य लेखा परिक्षक श्री. शरद देशमुख, जनसंपर्क अधिकारी सौ. छाया डांगळे. क्रीडा विभाग प्रमुख श्री. शांताराम चौधरी, भांडार विभाग प्रमुख श्री. अंकुश कदम हे उपस्थित होते.

सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री. राजेश घनघाव विभाग प्रमुख व दिव्यांग कल्याणकारी योजना विभागाचे कर्मचारी यांनी मेहनत घेतली.

(छाया प्रकाश डांगळे)
जनसंपर्क अधिकारी
उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — माहितीस्तव.
मा. प्रशासक तथा आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका

प्रत — योग्य त्या कार्यवाहिस्तव रवाना.

१) पत्रकार कक्ष, उल्हासनगर महानगरपालिका
२) सिस्टीम ॲनॅलिस्ट, माहिती तंत्रज्ञान विभाग, उल्हासनगर महानगरपालिका
- सदरची प्रेस नोट उल्हासनगर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी.